# पंचकृष्ण

* पंचकृष्ण आराध्य दैवत
* चक्रधरांनी मूर्तिपूजा नाकारली
* तत्त्वोपदेश हे महानुभावांच्या विचारांचे अष्टक भूमिती हे आचारांचे सूत्र → विचारापेक्षा आचार श्रेष्ठ, उक्ती पेक्षा कृती श्रेष्ठ, बोले तैसा चाले..., शिस्तीला महत्त्व
* दशावतार

*महानुभावांचे पंचकृष्ण

## * महानुभावीयांचे पंचकृष्ण — (महानुभावीयांचे पाच अवतारी पुरुष)

महानुभाव संप्रदायात 'पंचकृष्ण' ही संकल्पना पाच अवतारी पुरुषांसाठी वापरली आहे. या पंचकृष्णात श्रीदत्तात्रयप्रभू, श्रीकृष्ण चक्रवर्ती, श्रीचांगदेव राऊळ (चक्रपाणी), श्रीगुंडम राऊळ (गोविंदप्रभू), श्रीचक्रधरस्वामी अशी आहे. या पाच अवतारांपैकी श्रीकृष्ण व दत्तात्रयप्रभू हे कलियुगापूर्वीचे व चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ, श्रीचक्रधरस्वामी असे हे तीन अवतार कलियुगातील असल्याचे सांगितले जाते. अवतारांच्या दृष्टीने श्रीदत्तात्रयप्रभू त्रेतायुगातील असल्याने त्यांचा अवतार द्वापरयुगातील श्रीकृष्णाच्या अगोदरच्या युगात येतो. महानुभाव संप्रदायासाठी चक्रधर स्वामी हेच श्रीकृष्णाचे कलियुगातील अवतार आहेत. या पंचकृष्णाचा परिचय थोडक्यात करून घेऊ या.

## १) श्रीदत्तात्रयप्रभू —

महानुभाव पंथात श्रीदत्तात्रयप्रभू आदिकारण म्हणून ओळखले जातात. परंतु हा दत्त श्रीपादवल्लभांच्या संप्रदायातला नाही. तर हा दत्तात्रय राऊळमुख्य आहे. पाच अवतारांपैकी तिसरा अवतार ~~चां~~ चांगदेव राऊळांचा. राऊळांपासून गोविंदप्रभूंनी, गोविंदप्रभूंपासून श्रीचक्रधरांनी दीक्षा घेतल्याची सांगितली जाते. 'या मार्गासि श्रीदत्तात्रयप्रभू आदिकारण' असे चक्रधरांनी म्हटले. यावरून श्रीदत्तात्रयप्रभू हे या संप्रदायाचे मूळ पुरुष म्हणून ओळखले जातात. श्रीदत्तात्रयप्रभूंचे शयनस्थान माहूर जिल्हा नांदेड येथे आहे.

## २) श्रीकृष्ण-चक्रवर्ती —

पंचकृष्णांपैकी दुसरा परमेश्वरावतार म्हणजे द्वापार युगातील श्रीकृष्ण होय. हा अवतार परमेश्वराचा पूर्ण अवतार म्हणून ओळखला जातो. श्रीकृष्णाने अर्जुनाला

* नकुळाचे युद्ध, कंसाचा वध, अर्जुनाला उपदेश, संगीत-सौंदर्य.

सांगितलेली गीता महानुभाव पंथ प्रमाण मानतो. हा गर्भीचा अवतार आहे. श्रीकृष्ण म्हणजे चालता-बोलता देव होय. श्रीकृष्णाच्या स्वभावातली मित्रप्रेम, विनोदबुद्धी, मातृभक्ती इ. गुण उल्लेखनीय आहेत. श्रीकृष्ण हा मानव-देहधारी असल्यामुळे श्रीकृष्णाच्या ठिकाणी मानवमनाचे सर्व भाव जागृत आहेत. अशा या श्रीकृष्णाचे दर्शन महानुभावीय वाङ्मयात सर्वत्र घडते.

## 3) चांगदेव राऊळ — (चक्रपाणी)

पंचकृष्णापैकी तिसरे परमेश्वरावतार म्हणजे श्रीचांगदेव राऊळ किंवा चक्रपाणी हे होत. चांगदेव प्रथमापासूनच विरक्त होते त्यामुळे लग्न करूनही आपल्या पत्नीपासून ते दूर राहिले. पुढे यात्रेचे निमित्त करून फलटण हून (सातारा) माहूरला आले. गृहस्थाश्रमाचा त्याग करून अवधूताचा वेष धारण करून राऊळांनी भिक्षावृत्ती स्वीकारली; राऊळांची कीर्ती सर्वत्र पसरली. एका कामाख्या नावाच्या स्त्रीने त्यांच्याकडे आकर्षित होऊन रतिसुखासाठी विनवणी केली, ती रोखत नाही हे पाहून चांगदेवांनी देहत्याग करून हरपाळदेवाच्या मृतदेहात प्रवेश केला आणि राऊळ नवीन अवतार स्वीकारला. हा नवीन अवतार म्हणजे महानुभाव पंथाचे श्रीचक्रधर होत.

## 4) श्रीगोविंदप्रभु — (गुंडम राऊळ)

श्रीगोविंदप्रभु हे महानुभावांच्या पंचकृष्णापैकी चवथे परमेश्वरावतार होत. गोविंदप्रभु शिक्षणासाठी रिद्धपुरास आले (काटसुर गाव). तत्पूर्वी गोविंदप्रभुंनी श्रीचक्रपाणीकडून संन्यासाची दीक्षा घेतली. श्रीचक्रधरांच्या मृत्यूनंतर शिष्य मंडळींना गोविंदप्रभुंनीच आधार दिला. धावण्याची निमित्ते यांच्यामुळेच आली. पंचकृष्णांच्या नामावलीत यांचा उल्लेख (ऋद्धिपुरचे गुंडमराऊळ) असा होतो. त्यांचे मूळ नाव गुंडो किंवा

गुंडम असे होते. गोविंदप्रभूंचा अवतार हा दवडण्याचा अवतार होता.
वेड्यापिशाचा

## 5) श्रीचक्रधर स्वामी –

महानुभाव संप्रदायातील शेवटचे अवतार म्हणजे श्रीचक्रधर स्वामी होत. गुजराथमधील भडोच येथील प्रधानपुत्र हरपालदेवाचा मृत्यू झाल्यानंतर त्या देहात परमेश्वरांनी प्रवेश केला व नवीन अवतार जन्माला आला, अशी कथा सांगितली जाते. या पुरुषाने संसाराचा त्याग करून यात्रेच्या निमित्ताने रिद्धपूरला आले. विरक्त अवस्थेत राऊळांच्या गोविंदप्रभूकडून त्यांना प्रसादरूपाने शक्तिदान मिळाले. त्यांचे चक्रधर असे नामकरण ही गोविंदप्रभूंनीच केले. हेच चक्रधर श्रीकृष्णाचे कलियुगातील अवतार म्हणून ओळखले जातात.

# पंथप्रवर्तक, समाजसुधारक, मराठी भाषेचे कैवारी.
* पित्याचे नाव - विशाळदेव / चक्रधर
मातेचे नाव - माल्हणदेवी, नामांतर - चक्रधर